गुरुवार, दि. २० नोव्हेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ८७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# गावकऱ्यांचा संताप उसळला; भ्रष्टाचारग्रस्त मुख्याध्यापक चाऊस यांच्या बडतर्फीची मागणी; उपोषणाचा ईशारा

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यपद्धतीचे गावकऱ्यांकडून कौतुक; शिक्षक संघटनांच्या दबाव तंत्राची सखोल चौकशी करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी - तालुक्यातील** राममूर्ती येथील ग्रामस्थांनी निलंबित मुख्याध्यापक अब्दुल्ला चाऊस यांच्या बडतर्फीची आक्रमक मागणी करत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले आहे. क्रीडांगण विकास कामातील कथित भ्रष्टाचारामुळे मुख्याध्यापक चाऊस यांच्यावर कारवाई करण्यात आली असून, ही त्यांची तब्बल तिसरी निलंबनाची कारवाई असल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली.

तक्रारदार शरद किसनराव लकडे, गोरखनाथ बालाभाऊ मुळे, विलास मगर तसेच समस्त ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात मुख्याध्यापक चाऊस यांच्या दीर्घकालीन गैरव्यवहारांचा सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. गावातील उर्दू प्राथमिक शाळेच्या विकास कामावर गदा आणणाऱ्या, शासन निधीचा गैरवापर करणाऱ्या अशा भ्रष्ट मुख्याध्यापकाला सेवेत ठेवणे म्हणजे शिक्षण व्यवस्थेवर कलंक आहे, असे ग्रामस्थांनी ठामपणे नमूद केले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा न्याय्य निर्णय गावकऱ्यांसाठी दिलासा**

मुख्याध्यापकाविरोधातील तक्रारी वर्षानुवर्षे दाबल्या अथवा दबल्या जात असतांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता थेट निलंबनाची कारवाई केली. या निर्णयामुळे गावकऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या प्रामाणिक आणि पारदर्शक प्रशासनाची मनापासून प्रशंसा केली आहे. आपण न्यायपूर्ण व पारदर्शक निर्णय घेत संबंधित मुख्याध्यापकास निलंबित केले. केवळ निलंबन नव्हे, तर त्यांच्या सर्व पूर्वीच्या प्रकरणांची एकत्रित चौकशी करून थेट बडतर्फी व्हावी, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

**शिक्षक संघटनांचा दबाव? गावकऱ्यांची तीव्र प्रतिक्रिया**

दरम्यान, काही शिक्षक संघटनांनी प्रशासनावर दबाव टाकण्यासाठी ७ दिवसात निलंबन मागे घ्या, नाहीतर उपोषणाला बसू अशा प्रकारची विधाने पत्रकारांशी बोलताना केली असल्याचे वृत्त विविध वृत्तपत्रात आले आहे. यावर गावकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

ग्रामस्थांचा सवाल आहे की, भ्रष्टाचारावर कारवाई झाली की शिक्षक संघटना बचावासाठी का धावतात? शासन मान्यताप्राप्त संघटनांचे हे काम आहे का? मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निर्णयाला आव्हान देण्याची हिम्मत या संघटनांना कशी होते?

गावकऱ्यांनी स्पष्ट केले की जर शिक्षक संघटना असे दबावतंत्र वापरणार असतील, तर ग्रामस्थही ७ दिवसांनंतर जिल्हा परिषदेसमोर उपोषणाला बसणार आहेत. पूर्वीची दोन निलंबने आणि वारंवार होणारे भ्रष्टाचाराचे आरोप मुख्याध्यापक चाऊस यांच्यावर आधीही विविध प्रकारच्या शाळा-कारभारातील अनियमितता, निधी गैरवापर व शिक्षण गुणवत्तेवर परिणाम करणाऱ्या संशयास्पद व्यवहारांचे आरोप झाले होते. त्यातून दोनदा निलंबन झाल्यानंतरही सुधारणा न झाल्याने ग्रामस्थांनी या तिसऱ्या निलंबनाला शेवटची इशारतीची पायरी म्हणून संबोधले आहे. वारंवार कारवाया झाल्या तरीही त्यांच्यावरील खात्रीशीर निर्णय न घेतल्यामुळेच त्यांची हिम्मत वाढली, असे निवेदनात म्हटले आहे.

**गावकऱ्यांची एकमुखी मागणी: बडतर्फीशिवाय पर्याय नाही**

राममूर्ती येथील शालेय समिती अध्यक्ष भागवत मुळे, उपाध्यक्ष रशीद मदार घोचीवाले यांनीही या मागणीला पाठिंबा दर्शविला आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातील भ्रष्टाचार सहन केला जाणार नाही. तिसऱ्यांदा निलंबन झालेले अधिकारी सेवेत राहण्यास पात्र नाहीत, अशा ठाम निष्कर्षापर्यंत ग्रामस्थ पोहचले आहेत.

**संपूर्ण प्रकरणाची स्वायत्त चौकशी आणि शिक्षक संघटनांची भूमिका तपासा - ग्रामस्थांची मागणी**

ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेकडे दोन प्रमुख मागण्या ठामपणे मांडल्या आहेत, मुख्याध्यापक अब्दुल्ला चाऊस यांची सर्व प्रकरणे एकत्र करून तात्काळ बडतर्फ करा., शिक्षक संघटना प्रशासनावर दबाव आणत असल्यास त्यांच्या कार्यपद्धतीची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे पान २ वर

### अवैधधंद्यावाल्यांनी संघटना काढली तर...

संघटना ह्या त्यांच्या सभासद, सदस्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देणाऱ्या असतात. शिक्षक संघटना असो, पत्रकार संघटना असो, व्यापारी संघटना अथवा ईतर शासकीय -निमशासकीय संघटना असो सर्व संघटना ह्या न्याय हक्कासाठी लढण्यासह अन्यायाविरोधात व त्यांच्या ईतर मागण्यांसदर्भात लढत असतात. असे असतांना एखाद्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले तर संघटनांनी अशा व्यक्तींना पाठींबा देत वाचविण्याचे प्रयत्न करणे कितपत योग्य आहे असा प्रश्न निर्माण होत आहे. असे झाल्यास भविष्यात माफियागिरी करणारे, चोरटे, अवैध धंद्यावाल्यांनी संघटनेची उभारणी करुन त्यांच्या घटकातील व्यक्तींसाठी आंदोलन, उपोषणाचे ईशारे दिले तर त्याचा सामाजिक काय परिणाम होईल याची कल्पना न केलेली बरी, त्यामुळे संघटना कोणतीही असो या संघटनांनी योग्य व्यक्तीच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे गरजेचे आहे. आरोप होतात. मात्र, तीन तीन वेळेस निलंबन झाल्यानंतर अशा व्यक्तीच्या पाठीशी संघटनांनी उभा राहावे का? याचा विचार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी करायला हवा.

युवा आदर्श

### मतांतरे ...

**चाले मते मतांतरे**
**दुर्घटना घडे कशी**
**शहाणपणा उसळे**
**का वेळ येते अशी**
**विविध स्तरावरती**
**होईलंसुरु चौकशी**
**माय मेली कुणाची**
**जिवंतअसे मावशी**
**स्वयं घोषित पंडीत**
**पीएचडीकार हौशी**
**सल्ले देत सुटतात**
**झटके बुध्दी बुरशी**
**व्हाटसॅपभूषण बडे**
**सोडी सडल्या घुशी**
**नवीन ज्ञान जगाला**
**मिरवे केवढी खुशी**
**आपणसोडून विश्व**
**समस्त सगळे दोषी**
**चविनेपाहती संहार**
**काही विघ्न संतोषी**
**वाजवे सकाळभोंगे**
**वाचाळवीर उपाशी**
**वाळे शिळी भाकरी**
**खायचीमात्र तुपाशी**
**योग्यआहे का वर्तन**
**गोष्ट करावी मनाशी**
**प्रतारणा आत्म्याशी**
**वेगळे वागी जनाशी**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विद्युत विकासासाठी ३४ कोटी ४५ लाख रुपयांचा भरीव निधी मंजूर

## नळडोह पेवा येथील ३३/११ के. व्ही. पेवा प्रस्तावित उपकेंद्राच्या जागेच आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते भूमिपूजन

**परतूर । मंठा । प्रतिनिधी -** परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघातील वाढत्या विजेच्या मागणीला प्रतिसाद देत तथा ग्रामीण आणि शहरी भागांतील नागरिकांना दर्जेदार, अखंडित आणि स्थिर वीजपुरवठा मिळावा यासाठी राज्य शासनाने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मतदारसंघातील नूतन उपकेंद्रे, अतिरिक्त रोहित्रे, क्षमतावाढ व विद्यमान उपकेंद्रांच्या विस्तारासाठी तब्बल ३,४४५.00 लाख रुपये म्हणजेच ३४ कोटी ४५ लाख रुपयांचा मोठा निधी मंजूर करून या भागाच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला अपूर्व गती देण्यात आली आहे. ही संपूर्ण कामे परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार, माजी मंत्री व भाजपा नेते आ. बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्यांनी मंत्रालय ते महावितरण, महापारेषण, ऊर्जा विभाग अशा विविध स्तरांवर या कामांचा जोरदार पाठपुरावा केला होता. विजेच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी, घरगुती ग्राहकांना जाणवणारे व्होल्टेजचे चढ-उतार, उपकेंद्रांवरील ओव्हरलोड, भावी औद्योगिक गुंतवणुकीसाठी आवश्यक क्षमता व ग्रामीण भागांसाठी विश्वसनीय वीजपुरवठा यांचा एकत्रित विचार करून या मोठ्या निधीची आवश्यकता त्यांनी पुन्हा पुन्हा शासनापुढे मांडली होती. यासाठी विशेषतः पेवा (मंठा) येथे ३३/११ केव्ही पान २ वर



### भाजपा पक्षाची विचारधारा ही समाजाभिमुख, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक - आमदार बबनराव लोणीकर

नळडोह (पेवा) येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने खोराड सावंगी जिल्हा परिषद गटातील लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा उत्साहात संपन्न झाला. या संवाद मेळाव्यात मार्गदर्शन करताना आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना जिल्हा परिषदेस तसेच सर्व पंचायत समित्यांवर भारतीय जनता पक्ष आपली ठाम सत्ता प्रस्थापित करेल, असा ठाम विश्वास व्यक्त केला. या वेळी बोलताना त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या विकासाभिमुख पान २ वर

### आमदार लोणीकर यांच्या नेतृत्वात कीर्तपूर तांड्यातील शेकडो तरुणांचा भाजपात पक्षप्रवेश

कीर्तपूर तांडा येथील समाधान पवार, गणेश राठोड, दिपक पवार, गुलाब चव्हाण, अनुश पवार, धर्मा पवार, अनिल चव्हाण, सुदाम चव्हाण, संतोष राठोड, सुनिल पवार, अचित पवार, सिताराम राठोड, सबाराम राठोड, आनेश पवार, उत्तम पवार, नितीन पवार, सौरभ पवार, योगेश पवार, प्रविन पवार, कपिल पवार, प्रकाश पवार यांसह शेकडो तरुणांनी भाजपात जाहीर प्रवेश केला. परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांच्या विकासकामांवर, स्पष्ट नेतृत्वावर पान २ वर

## बिकट अवस्थेत स्टेडियम; आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव

# स्व. घोगरे स्टेडियम व आरोग्य केंद्राच्या नुतनीकरणासाठी प्रस्ताव तयार करा

## सौ. संध्या देठे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जालना - प्रतिनिधी -** जुना जालना परिसरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये असलेले स्व. कल्याणराव घोगरे स्टेडियम सध्या पूर्णपणे उध्वस्त स्थितीत असून, खेळाडूंच्या प्रशिक्षणाची किंवा क्रीडा विकासाची कोणतीही सुविधा शिल्लक राहिलेली नाही. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी आणि तात्काळ नुतनीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यासाठी समाजसेविका सौ. संध्या देठे यांनी जिल्हाधिकारी तथा प्रशासक आयुक्त श्रीमती अशीमा मित्तल यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

स्टेडियमचा संपूर्ण परिसर आज टवाळखोर, मद्यपी आणि मोकाट प्राण्यांचे अड्डे बनल्याचा गंभीर आरोप सौ. देठे यांनी केला. ज्या जागेवर मुलांनी खेळावे, धावावे, कबड्डी-खो-खोचा सराव व्हावा त्या जागेवर आता दहशतीचे वातावरण आहे. महिलांनाही सुरक्षितपणे फिरता येत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक नागरिकांनीही अनेकदा गैरसोयींचा सामना मोठ्या प्रमाणावर केल्याचे सांगितले.



स्टेडियममध्ये मूलभूत सुविधा पूर्णपणे ठप्प अवस्थेत आहेत, कुठलाही जॉगिंग ट्रॅक नाही, कबड्डी, खो-खो मैदानांची सुविधा नाही, मुलांसाठी किंवा महिलांसाठी स्वतंत्र व्यायाम/योग हॉल नाही, स्केटिंग, वॉकिंग, व्यायाम सुविधांचा पूर्ण अभाव आहे.

या सुविधांचा विचार करून महानगरपालिकेकडून विशेष नुतनीकरण प्रस्ताव तयार करावा, अशी मागणी संध्या देठे यांनी केली.

सुविधाविहीन शिवनेरी नगर आरोग्य केंद्र - डॉक्टरांसाठी जागा नाही, महिलांसाठी शौचालयही नाही

जुना जालना येथील नागरिकांसाठी शिवनेरी नगरामध्ये महानगरपालिकेकडून आरोग्य केंद्र चालवले जात असले तरी त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. गावातील नागरिकांसोबत प्रत्यक्ष पाहणी करून सौ. देठे यांनी आरोग्य केंद्राची दयनीय परिस्थिती अधोरेखित केली.

आरोग्य केंद्रातील गंभीर समस्या आहेत, डॉक्टर बसण्यासाठी स्वतःची योग्य खोली नाही, महिला डॉक्टर व महिला नर्सेससाठी मूलभूत सुविधा नाहीत. शौचालयांचा पूर्ण अभाव, पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध नाही, संपूर्ण परिसरात घाणीचे साम्राज्य, दूषित वातावरणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम, आरोग्य सुविधा देण्याच्या जागेवर अशी पान २ वर

# नगर परिषद निवडणूक जाहिरात प्रमाणिकरणासाठी समिती

**जालना । प्रतिनिधी -** नगर परिषद सह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक आणि प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराला समान संधी मिळावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाने माध्यम क्षेत्रातील सर्व नियमांचे काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने व्यापक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेत माध्यमांचा गैरवापर थांबविणे, मतदारांची दिशाभूल होऊ न देणे आणि जाहिरातीतील आचारसंहितेचे पालन बंधनकारक करण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली असून, अपर पोलीस अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार आणि मुख्याधिकारी हे या समितीचे सदस्य असुन, जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून समितीचे कामकाज पाहणार आहेत.

उमेदवार तसेच राजकीय पक्षांना कोणतीही निवडणूक संबंधित जाहिरात इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर प्रसारित करण्यापूर्वी पूर्वप्रमाणन घेणे अनिवार्य आहे. भारतीय संविधान व कायद्यांना विरोध करणारा मजकूर, धर्म, जात, भाषा, लिंग किंवा पेहरावावर आधारित द्वेष निर्माण करणारे संदेश, प्रार्थनास्थळांचे फोटो किंवा व्हिडिओ, हिंसेला किंवा अस्थैर्याला प्रोत्साहन देणारे मजकूर व्यक्ती, संस्था किंवा न्यायालयाची पान २ वर


# संपादकीय पान

## स्वार्थी राजकारणाची परतूरमधील नवी आवृत्ती

परतूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी केलेला अचानक राजकीय कलाटणीचा निर्णय हा केवळ एका उमेदवारीपुरता न राहता, स्थानिक राजकारणातील स्वार्थी, संधीसाधूपणाच्या जुनाट पद्धतींचा आणखी एक नमुना ठरत आहे. वर्षानुवर्षे सत्ता भोगताना जेथलिया गटावर खोटी आश्वासने, निष्ठावंतांची उपेक्षा, आणि स्वार्थ साधण्यासाठी वारंवार दिले जाणारे राजकीय शब्द याबाबत चर्चा तीव्र होत गेली. मात्र या वेळी त्यांनी घेतलेल्या निर्णयाने त्या आरोपांना जणू काही शिक्कामोर्तबच केले आहे. ऐनवेळी स्वतःचा प्रभाव आणि अस्तित्व टिकवण्यासाठी आखलेली चाल असल्याचे स्पष्ट दिसते. विकासाचा मुद्दा, निष्ठावंताचे स्थान किंवा कार्यकर्त्यांचा सन्मान यापैकी काहीही विचारात न घेता केवळ स्वतःचा राजकीय भविष्यकाळ सुरक्षित करण्यासाठी घेतलेला हा निर्णय अनेक प्रश्न उभे करतो. अजित पवार गटातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलत बाहेरून 'आयात उमेदवार' देणे, हे परतूरमधील जनतेचा तसेच पक्षीयांचा विश्वास तोडणारे पाऊल आहे. ज्यांनी दशके साथ दिली, तेच लोक अचानक हाशियेवर; आणि राजकीय सोयीसाठी तयार झालेली युती मध्यवर्ती ठिकाणी अशी उलटापालट लोकशाहीच्या आरोग्यासाठी धोकादायक आहे. निष्ठा, मूल्ये आणि पक्षाचे तत्त्वज्ञान यांचे काहीच स्थान शिल्लक राहत नाही, जेव्हा राजकारण फक्त 'व्यक्तीपुरते' मर्यादित होते. परतूरमधील सध्याची तिरंगी लढत अधिक चुरशीची होणार हे खरे; परंतु लोकांच्या मनात एक स्पष्ट प्रश्न निर्माण झाला आहे - हे सर्व परतूरच्या विकासासाठी आहे की एका व्यक्तीच्या राजकीय बळकटीसाठी? मतदारांच्या मनातील हीच शंका जेथलिया यांच्या नव्या आघाडीच्या स्वीकारार्हतेवर परिणाम करू शकते. राजकीय जाणकार अनेक वर्षांपासून सांगत आले आहेत की, स्वार्थी राजकारणाची ही स्टाईल अल्पकालीन फायद्याची असली, तरी दीर्घकालीन परिणाम नेहमीच नकारात्मकच ठरतात. लोक नेमके पाहतात - कोण आपल्यासाठी उभे राहते आणि कोण फक्त स्वतःसाठी पळते? जेथलिया यांच्या या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे त्यांच्या स्वतःच्या भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परतूरमध्ये निर्माण झालेली ही गोंधळलेली परिस्थिती हा एका मोठ्या सत्याचा पुरावा आहे - सत्तेची भूक वाढली की जनतेची अपेक्षा, निष्ठावंतांचे योगदान आणि नैतिकतेची चौकट सर्वप्रथम तुटते. आगामी काही दिवस राजकीय समीकरणे बदलतील; प्रचारमोहीमा तापतील. मात्र परतूरकर मात्र एकच प्रश्न विचारतील - परतूरच्या भविष्यासाठी लढणारे कोण? आणि स्वतःच्या भविष्यासाठी लढणारे कोण?

## २२ जिल्ह्यांतून १ हजारांहून अधिक मंदिर विश्वस्तांची शासनाकडे जोरदार मागणी !

# देवस्थानांच्या भूमींचे रक्षण करण्यासाठी अँटी लँड ग्रॅबिंग अ‍ॅक्ट राज्यात तात्काळ लागू करा!





**पुणे** - महाराष्ट्रातील देवस्थानांच्या हजारो एकर जमिनी भूमाफियांनी, महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीरपणे हडपल्या आहेत. या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी, गुजरात व कर्नाटकच्या धर्तीवर कठोर 'अँटी लँड ग्रॅबिंग क्ट' लागू करावा, अशी जोरदार मागणी महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांतील १,००० हून अधिक मंदिर विश्वस्तांनी एकाच वेळी केली. मंदिर महासंघाच्या नेतृत्वाखाली ही मागणी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. महसूल राज्यमंत्री श्री. योगेश कदम यांच्यासह सुमारे २२ जिल्हाधिकारी, तहसिलदार, तसेच आमदार यांना ३०० हून अधिक निवेदने सादर करण्यात आली आहेत.

या राज्यव्यापी अभियानात रायगड येथील श्री हरिहरेश्वर, सातार्‍याचे श्री सज्जनगड, पालीतील श्री बल्लाळेश्वर, वसईचे श्री परशुराम तपोवन, नाशिकचे श्री मुक्तीधाम, आकोट-अकोल्याचे श्री कान्होबा, रत्नागिरीचे श्री काशी विश्वेश्वर, कोल्हापूरचे श्री उजळाई व अनेक क्षेत्रातील मंदिरांचा, तसेच महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या राज्य स्तरीय कोअर टीमच्या सर्व सदस्यांनी सहभाग घेतला. विविध जिल्ह्यातील हिंदुत्वनिष्ठ संघटनांसह अकोला येथील १६० अधिवक्त्यांनी या उपक्रमात सहभागी झाले. तर वसई येथे संत बी.पी. सचिनवाला यांची उपस्थिती होती

मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी म्हटले केले की , देवस्थानांच्या इनाम जमिनी (वर्ग-३) कायद्याने अहस्तांतरणीय असतांनाही, महसूल विभागातील भ्रष्टाचारामुळे भूमाफियांना मुक्त संधी मिळाली असून हजारो एकर जमिनी हडपल्या आहेत. केवळ पश्चिम महाराष्ट्रातच ६७१ गटांवर थेट अतिक्रमण झाले आहे; विदर्भातील अमरावती,



अकोला जिल्ह्यांत ५० कोटींची जमीन केवळ ९६० रुपयांना विकल्याचे समोर आले आहे.

सर्वोच्च न्यायालय (२००७) आणि मुंबई उच्च न्यायालय (२०२५) यांनी धार्मिक संस्थांच्या मालमत्तेचे संरक्षण राज्याचे कर्तव्य असल्याचे निर्देश दिले आहेत. तरीही फौजदारी कायद्याअभावी भूमाफियांना मोकळे रान मिळाले आहे. प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहत असल्यामुळे मंदिरांना न्याय मिळत नाही. गुजरातमध्ये 'जमीन हडपणे' अजामीनपात्र व दखलपात्र गुन्हा असून १४ वर्षांपर्यंत तुरूंगवास व बाजारमूल्याएवढा दंडाची तरतूद आहे.

या कायद्याप्रमाणे महाराष्ट्रात अध्यादेश तात्काळ लागू करण्यात यावा. येत्या अधिवेशनात कायदा संमत करावा. यातील गुन्हे दखलपात्र-अजामीनपात्र असावेत. मागील २०-२५ वर्षांतील जमीन हस्तांतरणांची चौकशीसाठी उच्चपदस्थ पोलीस-महसूल अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय विशेष तपास पथक स्थापन करावे. प्रत्येक विभागात विशेष जलदगती न्यायालये स्थापन करून खटले ६ महिन्यांत निकाली काढावेत.

महसूलमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी जमीन व्यवहारांवर बंदी व समिती स्थापनेचे आश्वासन दिले आहे, मात्र त्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी. मंदिरांना दैनंदिन खर्चासाठी भक्तांपुढे हात पसरावे लागतात, तर भूमाफिया कोट्यवधींच्या जमिनीवर मजा मारतात. ही परिस्थिती महाराष्ट्रासाठी साजेशी नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शानुसार देवस्थानांचे रक्षण करण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा मंदिर महासंघासह मंदिर विश्वस्तांनी व्यक्त केली आहे.

पान १ वरुन

## गावकऱ्यांचा संताप ...

करण्यात आली आहे. येत्या सात दिवसात योग्य कारवाई न झाल्यास उपोषणाला बसण्याचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

या निवेदनावर शालेय समितीचे अध्यक्ष भागवत मुळे, शालेय समिती उपाध्यक्ष रशीद घोचीवाले, रामकिसन मुळे, रावसाहेब गिराम, संजय शिंगाडे, कैलास राऊत, गोरखनाथ मुळे, चंद्रकांत कदम, अमोल गिराम, विठ्ठल गिराम, दत्ता गिराम, दिलीप गिराम, ओमकार मुळे, गंगाराम गिराम, डिगांबर गिराम, दिलीप मुळे, प्रकाश गिराम, रमेश मुळे, प्रताप गिराम, संदीप गिराम, शरद लकडे, राजेंद्र मुळे, बालाजी मुळे, रामेश्वर उगले, रामप्रसाद मुळे, कैलास मुळे, भगवान गिराम, सुधाकर गिराम, कृष्णा गिराम, गणेश चौधरी, मधुकर चौधरी, गंगाधर शिंगणे, प्रकाश मगर, दत्ता खरात, गणेश चौधरी, सुदाम सातपुते, अमोल गोरे, सुधाकर पाटोळे, अजय गिराम, नारायण मुळे, ज्ञानेश्वर मुळे, विलास मुळे, लक्ष्मण सातपुते, विकास मगर, सचिन मगर, गणेश मुळे, सुलाबाई मगर, राजेंद्र मगर, बाबासाहेब ढोले, ईस्माईल परसुवाले, नारायण शिंगणे, हरीभाऊ गिराम, विकास मुळे, किसन चौधरी, आकाश मुळे, गणेश गिराम, लक्ष्मण मुळे, अर्जुन शिंगाडे, शेलार गिराम, दत्ता रोडगे, भाऊसाहेब, शकील परसुवाले, अनील मुळे, संतोष गिराम, विठ्ठल चौधरी, संभाजी शिंगाडे, दामोधर कोल्हे, मुकेश मगरे, संतोष शिंमगे, प्रदीप खरात, भाऊसाहेब गिराम, परमेश्वर गिराम, लाला परसुवाले, विष्णु मगर, सुरेश गोरे, निवृत्ती गिराम, मिलींद मगरे, गौरव गिराम, सोमनाथ मुळे, अप्पासाहेब नंदनवरे, अमोल गोरे, विष्णु शिंगाडे, कारभारी शिंगाडे, याकुब परसुवाले, सुधाकर मगर, पीरू परसुवाले, अशोक मगर, रशीद घोचीवाले, उस्मान परसुवाले, सीराज घोचीवाले, जलाल मुन्नीवाले, शहारुख घोचीवाले, अजिज घोचीवाले, अनिस परसुवाले, मोहम्मद घोचीवाले, ख्वाजा चौधरी, संजय शिंगाडे, शिवाजी शिंगाडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## परतूर-मंठा विधानसभा ...

क्षमतेचे नविन उपकेंद्र (१५ चत) उभारण्यास मंजुरी देण्यात आली असून, या उपकेंद्रामुळे मंठा तालुक्यातील दहिफळ-खंदारे उपकेंद्रावरील भार मोठ्या प्रमाणात कमी होईल. वाढत्या वीज गरजांसाठी हा निर्णय अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. याशिवाय परतूर, मंठा व जालना ग्रामीण उपविभागांतर्गत लोणी, श्रीष्टी, इडोळी, तळणी, खांडवी, पांगरी गोसावी, केंधळी, कोकाटे हादगाव, जयपूर, वरफळ, आष्टी, सातोना, शेवली, नेर अशा जवळपास संपूर्ण मतदारसंघ व्यापणाऱ्या ३३/११ केव्ही उपकेंद्रांवर १५ चत ते ११० चत क्षमतेची अतिरिक्त रोहित्रे बसविण्यात येणार आहेत. या कामांच्या पूर्णत्वाने मतदारसंघातील एकही उपकेंद्र ओव्हरलोड राहणार नाही. वीज दाबातील चढउतार कमी होणार असून शेतपंपांना, घरगुती ग्राहकांना आणि औद्योगिक व लघुउद्योगांना उच्च दर्जाचा आणि सातत्यपूर्ण वीजपुरवठा मिळणार आहे. विशेषतः परतूर व वाढोणा येथील उपकेंद्रांमध्ये ११० चत क्षमतेची वाढ करण्यात येणार असून यामुळे १३२ केव्ही परतूर अतिउच्चदाब उपकेंद्राशी जोडलेल्या संपूर्ण परिसरावर थेट सकारात्मक परिणाम दिसून येईल. ग्रामीण भागातील वीज ताण व्यवस्थापनाची पातळी लक्षणीयरीत्या सुधारण्यास ही पावले निर्णायक ठरणार आहेत. या सर्व मोठ्या प्रकल्पांसाठी मंजूर झालेल्या निधीची अधिकृत माहिती स्वतः आमदार बबनराव लोणीकर यांनी नळडोह (पेवा) येथे भारतीय जनता पार्टीतर्फे आयोजित खोराड सावंगी जिल्हा परिषद गटातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व भाजपा कार्यकर्त्यांशी झालेल्या संवाद बैठकीत दिली. या बैठकीत बोलताना त्यांनी सांगितले की, परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाच्या दीर्घकालीन विकासासाठी दर्जेदार वीजपुरवठा ही अत्यंत प्राथमिक गरज आहे. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा-कोणत्याही क्षेत्राचा विकास विजेशिवाय शक्य नाही. म्हणूनच मी या कामांचा सातत्याने पाठपुरावा करत होतो आणि आज या सर्व कामांसाठी तब्बल ३४ कोटी ४५ लाख रुपयांचा भरीव निधी मिळाल्याने माझा संकल्प अधिक दृढ झाला आहे. यावेळी आमदार लोणीकर यांनी महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय, दूरदर्शी व विकासाभिमुख मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. मुख्यमंत्री महोदयांनी या कामांची तातडीची गरज ओळखून त्वरित मंजुरी दिली. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळेच आज लाखो नागरिकांना फायदा होणारी ही मोठी कामे प्रत्यक्षात येऊ शकली, असेही त्यांनी नमूद केले. या कामांमुळे परतूर-मंठा मतदारसंघातील वीज व्यवस्था आगामी अनेक वर्षे सक्षम, स्थिर आणि भविष्यकालीन गरजांसाठी सज्ज राहील. उच्चदाब उपकेंद्रांचे मजबुतीकरण, नवीन उपकेंद्रांची उभारणी, ओव्हरलोड उपकेंद्रांचे सुधारणा काम, क्षमतावाढ आणि ग्रामीण क्षेत्रासाठी विश्वसनीय वीजपुरवठा-या सर्व बाबींच्या दृष्टीने हा निधी ऐतिहासिक ठरत आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनमानात सुधारणा, शेतकऱ्यांच्या पाण्यावरील अवलंबित्वातील अडचणी कमी होणे, उद्योगपतींना स्थिर वीजपुरवठ्यामुळे व्यवसायाचा वाढता वेग, विद्यार्थ्यांना सुसज्ज वातावरणात शिक्षण, वीजपुरवठ्यातील अनियमितता कमी होणे या सर्व महत्वाच्या क्षेत्रांना या निर्णयाचा व्यापक लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे संपूर्ण मतदारसंघाचे विकासदृष्टीने नवे पर्व सुरू झाले असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी यापूर्वी केलेली विविध विकासकामे, रस्ते-विस्तार, पाणीपुरवठा प्रकल्प, शेतीसाठी उपयुक्त प्रकल्प अशा सर्व उपक्रमांमध्ये आता वीजपुरवठ्याचा दर्जा उंचावल्याने कामांची गती आणखी वाढण्याची अपेक्षा सर्वत्र व्यक्त होत आहे. परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघातील या ऐतिहासिक निधीमंजुरीमुळे संपूर्ण परिसरातील विजेची गुणवत्ता, उपलब्धता व विश्वसनीयता नवीन पातळीवर जाऊन पोहोचणार आहे.

## भाजपा पक्षाची ...

व लोककल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती दिली.
''भाजपा पक्षाची विचारधारा ही समाजाभिमुख, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक आहे. गरीब, शेतकरी, महिला, तरुण आणि सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याच्या उद्देशाने केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि राज्यातील आमचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वात अनेक उपयोजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत,'' असे आमदार लोणीकर म्हणाले. भाजपा शासनकाळात ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला नवा वेग मिळाला असून पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, वीज, महिला सक्षमीकरण, शेतकरी सवलती, पीकविमा यांसारख्या योजनांचा थेट लाभ जनतेपर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता पक्षाची संघटनात्मक तयारी, बूथस्तरावरील मजबुती, कार्यकर्त्यांची भूमिका आणि जनसंपर्क मोहिमेच्या रणनीतीवरही त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. जालना जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि सर्व स्थानिक संस्थांवर पुन्हा एकदा कमळच उमलणार आहे. विकासाच्या ध्येयाने चालणाऱ्या आमच्या कार्यकर्त्यांच्या ताकदीवर आणि जनतेच्या आशीर्वादावर आम्ही भाजपाचा प्रचंड विजय निश्चित करू, असा आत्मविश्वासही त्यांनी प्रकट केला. या बैठकीस उत्तमराव राठोड, भाजपा तालुका अध्यक्ष मंठा नितीन राठोड, विठ्ठलराव काळे, पांडुरंग काळे, प्रसादराव गडदे, सुरेश सरोदे, शिवाजी जाधव, विलास घोडके, अविनाश राठोड, कन्होबा थोरात, अशोकाआप्पा सोनटक्के, दारासिंग चव्हाण, मनोज देशमुख, नारायण कणसे, माणिक पवार, भागवत पोटे, नितीन चाटे, पोपटराव खंदारे, पवन खंदारे, प्रकाश गबाळे, भीमराव खंदारे, बाबाजी जाधव, सचिन राठोड, जानकीराम चव्हाण, शिवशंकर डोईफोडे, बाजीराव आघाव, परमेश्वर शिंदे, प्रकाश मोरे, गजानन फुपाटे, श्रीरंग देशमुख, राजू चावरे, रणजित ठोकरे, किरण देशमुख, सारंग सानप, सखाराम नवघरे, बाळासाहेब नवघरे, शंकर फड, पंकज राठोड, भीमराव चव्हाण, कैलास राठोड, अश्विन जाधव, रामजी देशमुख, माधवराव सरोदे, उद्धव पुणेकर, अशोक काळापाहाड, उद्धव धनगर, अंबादास पुणेकर, मुकुंद वायाळ, उमेश वायाळ, संभाजी चव्हाण, भास्कर जाधव, श्री चव्हाण, बाळासाहेब काळे, गोपाळ जाधव यांच्या सह खोराड सावंगी जिल्हा परिषद गटातील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संवाद मेळाव्यात झालेल्या थेट चर्चेमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवीन उर्जा संचारली.

## आमदार लोणीकर ...

आणि संघटनात्मक कामकाजावर विश्वास ठेवून या तरुणांनी भाजपा पक्षात प्रवेश करीत पक्षाची ताकद तांडा पातळीवर अधिक मजबूत केली. या मोठ्या पक्षप्रवेशामुळे कीर्तपूर तांड्यात भाजपाबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, तरुणांच्या सहभागामुळे संघटनेला नवउर्जा मिळाल्याचे जिल्ह्यात पाहायला मिळाले. आ. लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली येत्या काळात तांड्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास नव्याने प्रवेश केलेल्या तरुणांनी व्यक्त केला.

## स्व. घोगरे ....

दयनीय स्थिती असणे अमान्य असल्याचे सौ. देठे यांनी निवेदनात नमूद केले.

**जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट; परिस्थिती पाहून त्वरित प्रस्ताव तयार करण्याची मागणी**

निवेदनानंतर जिल्हाधिकारी तथा प्रशासक आयुक्त श्रीमती अशीमा मित्तल यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली. सौ. संध्या देठे यांनी दोन्ही ठिकाणांचे संपूर्ण नूतनीकरण, सुविधा उभारणी आणि विकासकामांसाठी त्वरित प्रस्ताव महानगरपालिका स्तरावरून तयार करण्याची मागणी केली आहे.

त्यात विशेष मागणी: घोगरे स्टेडियमचे संपूर्ण नुतनीकरण जॉगिंग ट्रॅक कबड्डी मैदान खो-खो ग्राउंड महिलांसाठी योगा हॉल स्केटिंग ग्राउंड सुरक्षेसाठी प्रकाशयोजना आरोग्य केंद्राचा विस्तार व सुविधा उभारणी डॉक्टरांसाठी स्वतंत्र व सुसज्ज खोली महिला रुग्णांसाठी स्वतंत्र सुविधा शौचालय व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था परिसराची स्वच्छता आणि नियमित देखभाल **स्थानिक नागरिकांचा पाठिंबा; विकास कामांची तातडीची गरज** निवेदनाच्या वेळी परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते आणि त्यांनीही आपल्या समस्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. आरोग्य, स्वच्छता आणि क्रीडा विकास या बाबींचा थेट संबंध नागरिकांच्या सर्वांगीण विकासाशी आहे. त्यामुळे या दोन्ही कामांची तातडीने अंमलबजावणी व्हावी, अशी जनतेचीही अपेक्षा आहे.

## नगर परिषद ...

बदनामी करणारी सामग्री, देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा पोहोचविणारे विधान, परकीय देशांबद्दल अवमानकारक विधाने, संरक्षण दलाचे फोटो किंवा व्हिडिओ, राजकीय नेत्यांवरील खोटे आरोप, व्यक्तींच्या खासगी आयुष्यात अनुचित हस्तक्षेप, अनैतिक, अश्लील किंवा नीतिनियमांच्या विरुद्ध सामग्री अशा स्वरूपाच्या जाहिरातींना अनुमती मिळणार नाही आणि त्यांना पूर्वप्रमाणनही प्रदान केले जाणार नाही.

जाहिरात खर्चाची पारदर्शकता

जर जाहिरात राजकीय पक्षाने केली असल्यास, त्याची नोंद पक्षाच्या निवडणूक खर्चात नोंदविली जाणार आहे. उमेदवाराने केली असल्यास, ती उमेदवाराच्या खात्यात नोंदविली जाणार आहे. सोशल मिडियावरील वैयक्तिक मते जाहिरात म्हणून समजली जाणार नाहीत; परंतु आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणत्याही पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या लेखी परवानगीशिवाय प्रचार केल्यास ती जाहिरात ठरेल आणि त्यासाठी प्रमाणन आवश्यक राहणार आहे.

पूर्वप्रमाणन अर्ज

निवडणुकीसाठी अर्ज करताना १० किंवा त्यापेक्षा कमी स्थानिक संस्थांसाठी जाहिरात करायची असल्यास जिल्हास्तरीय समितीकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल. १० पेक्षा अधिक किंवा राज्यभरासाठी जाहिरात करायची असल्यास राज्यस्तरीय समितीकडे अर्ज करवा लागेल. जाहिरात प्रसारित करण्यापूर्वी किमान ५ कामकाजाचे दिवस आधी (सुट्टीचे दिवस वगळून) संबंधीत समितीकडे अर्ज करावा लागेल. अर्जाचा नमुना व आवश्यक माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किंवा जिल्हा माहिती कार्यालय, तळ मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, जालाना येथून उपलब्ध करून घेता येईल. अर्जासोबत जाहिरातींची इलेक्ट्रॉनिक प्रत आणि साक्षांकित जाहिरात संहिता जोडणे बंधनकारक आहे. जाहिरातींची कोणतीही देयके धनादेश, धनाकर्ष व ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. अन्य भाषांतील जाहिरातींसाठी मराठी अनुवादित साक्षांकित केलेली प्रत व नोटराईज्ड अनुवाद प्रत जोडणे आवश्यक आहे. अर्ज ३ कामकाजाच्या दिवसात निकाली काढला जाईल. तसेच समितीने सुचिविलेले फेरबदल किंवा प्रसंग वगळणे अनिवार्य राहिल. मंजूर जाहिरातींना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अर्जदारास प्रमाणपत्र दिले जाईल.

मुद्रित माध्यमातील जाहिरात

मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिध्द करावयाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही. परंतु, अशा माध्यमातून जाहिरातील प्रसिध्द करताना आचारसंहिता किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होता कामा नये. तसेच, इतर प्रत्येक मुद्रित साहित्यावर प्रकाशक, मुद्रणालय, पत्ता, प्रत क्रमांक आणि प्रत संख्या नमूद असणे बंधनकारक आहे. उल्लंघन आढळल्यास प्रेस अ‍ॅक्टसह लागू प्रचलित कायद्यांनुसार कारवाई होईल.

संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमे आदी माध्यमाद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत.

# उपोषणकर्त्यांच्या दबावात येऊन प्रशासनाने अल्पभूधारक शेतकऱ्यांवर अन्याय करू नये

## सामाजिक कार्यकर्त्या पायल बुलबुले यांचे विभागीय आयुक्तांना निवेदन

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील केंधळी ते हातवन येथील बायपास रस्त्यासाठी हातून येथील काही ग्रामस्थ मंठा तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसलेले आहेत. परंतु उपोषणकर्त्यांच्या दबावात येऊन प्रशासनाने अल्पभूधारक शेतकऱ्यांवर अन्याय करू नये.अशी ठाम भूमिका सामाजिक कार्यकर्त्या पायल बुलबुले यांनी घेतली असून त्यांनी विभागीय महसूल आयुक्त छत्रपती संभाजीनगर व मंठा तहसीलदार सुमन मोरे यांना याबाबत निवेदन सादर केले असून त्या सोमवारी जिल्हाधिकारी जालना यांना भेटून त्यांच्याकडे देखील निवेदन सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मंठा तालुक्यातील पुनर्वसित हातवन येथील काही ग्रामस्थ केंदळी ते हातवन या बायपास रस्त्यासाठी सध्या मंठा तहसील उपोषणाला बसलेले आहेत. ही रस्त्याची मागणी केंधळी गावठाणालगत असलेल्या खाजगी मालकीच्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीमधून होत असल्याने संबंधित अल्पभूधारक शेतकऱ्यांनी याला तीव्र विरोध दर्शविला आहे.

रस्त्याचा प्रस्ताव त्यांच्या शेतातून जात असल्याची चर्चा सुरू झाल्याने बाधित शेतकऱ्यांनी तहसीलदार सुमन मोरे यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या. शेतकऱ्यांचे म्हणणे असे होते की आमच्या सातबारा नुसार आमच्या जमिनीमधून जर पांदण रस्ता किंवा गावठाणचे क्षेत्र जात असेल, तर आम्ही ते देण्यास तयार आहोत. पण वास्तविक हद्द कुठून आहे, हे सर्व तपासले जावे.त्यावर तहसीलदार मोरे यांनी तातडीने प्रशासकीय कारवाई करत भूमिअभिलेख विभागाकडून मोजणी करण्याचे आदेश दिले. मोजणी अहवालात स्पष्ट झालं



की संबंधित शेतजमिनीमध्ये पांदण रस्ता किंवा गावठाणचे कोणतेही क्षेत्र येत नाही.यामुळे शेतकऱ्यांच्या दाव्याला पूर्णतः पुष्टी मिळाली आहे.

सध्या बाधित शेतकरी हे सर्व अल्पभूधारक असून त्यांची शेती हीच उपजीविकेचे एकमेव साधन आहे. त्यामुळे त्यांनी प्रशासनाला कळविले की जबरदस्तीने आमच्या शेतातून रस्ता काढू नये. जर प्रशासनाकडे ह्या रस्त्यासाठी दुसरा पर्यायच उरला नाही, तर आम्ही आमच्या शेतातून रस्ता देण्यास तयार आहोत, परंतु आमच्या जमिनीत रस्त्यासाठी बाधित होणाऱ्या जमिनीचा आम्हाला योग्य मोबदला देण्यात यावा .

या संपूर्ण प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या पायल बुलबुले यांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांच्या बाजूने आवाज उठविला. विभागीय आयुक्त आणि तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की प्रशासनाने उपोषणकर्त्यांच्या दबावाला बळी पडून शेतकऱ्यांच्या जमिनीतून जबरदस्ती रस्ता करून त्यांच्यावर अन्याय न करता मोजणी अहवालात स्पष्ट झालेल्या तथ्यांचा सन्मान करून योग्य निर्णय घ्यावा.

एका बाजूला रस्ता मागणारे उपोषणकर्ते आहेत, तर दुसरीकडे आपल्या अल्पशेतीचे रक्षण करण्यासाठी शेतकरी ठामपणे उभे आहेत. तहसीलदारांनी केलेली तातडीची मोजणी प्रशासनाच्या भूमिकेला स्पष्ट दिशा देणारी ठरत आहे.आता विभागीय आयुक्तांकडून पुढील आदेश काय येतात, याकडे दोन्ही बाजूंचे लक्ष लागले आहे.

प्रशासनाकडून शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास प्रशासनाविरुद्ध न्यायालयीन लढा व मोठं आंदोलन उभारण्याचा इशारा पायल बुलबुले यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

# विभागीय स्पर्धेत माहोराचा सोहील पठाण प्रथम

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर ( औरंगाबाद) येथे दिनांक १८/११/२०२५ रोजी झालेल्या विभागीय Hammer Throw ( हतोडा फेक) स्पर्धेत भाग घेतला.

या स्पर्धे मध्ये माहोरा येथील पंडित जवाहरलाल नेहरु कॉलेज चा विद्यार्थी सोहील सुभान पठाण याने प्रथम क्रमांक पटकावला आणि तो राष्ट्रीय संघासाठी पात्र ठरला. तो ग्रामीण भागातील असून त्याने आपल्या मेहनतीच्या जोरावर यश संपादन केले आहे.या कामगिरी मुळे त्याचे सर्व स्तरावरून शुभेच्छा देण्यात येत आहेत पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. त्याचेवर जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# जिल्हास्तरीय स्पर्धेत श्री म. स्था.जैन माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश



**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांच्याशी संलग्न संस्था बाल रंगभूमी परिषद आयोजित जल्लोष लोककलेचा जिल्हास्तरीय स्पर्धेत विद्यालयाने जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला आहे त्यामधील गुणवंत विद्यार्थी शाहीर सोहम वाटस, ऑर्गन वादक - सादिक कुरेशी, ढोलकी वादक आदर्श जगधने, संबळ वादक करण उगले, कोरस गायक प्रणव काटे, कोरस गायक प्रथम वाटसर, संबळ वादक कुणाल पवार, तुंतूने वादक ओम उदावंत, टाळ वादक विवेक खंडागळे यांनी उत्कृष्ट असे सादरीकरण केले.

याप्रसंगी बालरंग भूमी नाट्य परिषदेच्या अध्यक्षा सिने अभिनेत्री ॲड. श्रीमती नीलम शिर्के- सामंत यांनी कौतुकाची थाप विद्यार्थ्यांच्या पाठीवर मारली तसेच बक्षीस वितरण जालना शाखेचे अध्यक्ष श्रीमती अभिनेत्री वैशालीताई दाभाडे, १०० शिक्षक क्लबचे अध्यक्ष राजेभाऊ मगर, मंगलनाथ मल्टीस्टेटचे संचालक तथा उत्कृष्ट लेखक विनोद वीर यांच्या हस्ते यशस्वी कलाकारांचा स्मृतीचिन्ह, बक्षीसांचा चेक देऊन सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना संदिप चव्हाण, डॉ. रवी कोंका, गजानन पत्ते, वैभव वानगोता व श्री मोहिते, श्रीमती इंदानी, श्रीमती ढगे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयातर्फे या सर्व यशस्वी कलाकारांचा शाळेच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला.

या सर्व विद्यार्थ्यांचे वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा, उपाध्यक्ष भरतकुमार गादिया, महामंत्री डॉ. धरमचंद गादिया, कोषाध्यक्ष संजय लूणावत, सहसचिव कचरूलाल कुंकूलोळ, विश्वस्त डॉ. गौतमचंद्र रुणवाल, विश्वस्त संजय कुमार मुथा, विश्वस्त नेमीचंद रुणवाल, विश्वस्त संजय बंब विश्वस्त प्रकाशचंद सुराणा, शांतीलाल संचेती तसेच शालेय समितीचे अध्यक्ष जितेशकुमार भायानी, उपाध्यक्ष विजयकुमार भंडारी, सचिव कांतीलाल कुंकलोळ, कोषाध्यक्ष विजयकुमार नहार एवंम शालेय समितीचे सर्व पदाधिकारी, तसेच शाळेचे मुख्याध्यापक शांतीलाल एम.वानगोता, उपमुख्याध्यापक डॉ. श्रीमती श्रीपत, पर्यवेक्षक श्रीमती सोमानी, श्री शिंदे विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# राज्यस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

## विभागस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत जालना जिल्हा शाईन कराटे-डू च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने १७ नोव्हेंबर व १८ नोव्हेंबर २०२५ रोजी विभागस्तरीय शालेय कराटे स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत जालना जिल्हा शाईन कराटे-डू च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली व आपले स्थान निश्चित केले

जालना जिल्हा शाईन कराटे-डु चे यशस्वी खेळाडू कु.तेजल भागडे जे ई एस कॉलेज,जालना

वय अंडर -१९, वजन गट -६३kg या विद्यार्थिनी पहिला क्रमांक प्राप्त केला व राज्यस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली

दुसरा क्रमांक आलेले खेळाडू शलमोन गुडेकर जे ई एस कॉलेज,जालना वय गट अंडर -१९,वजन गट -४८kg द्वितीय क्रमांक कु. पूर्वा माने श्रीमती इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,रामनगर, जालना वय गट अंडर -१९, वजन गट -६३kg द्वितीय क्रमांक तृतीय क्रमांक आलेले खेळाडू कु.अश्विनी आजगे श्री गणपती माध्यमिक, व उच्य माध्यमिक विद्यालय,जालना वय गट अंडर -१९, वजन गट -४५ kg तृतीय क्रमांक कु. वैष्णवी लूटे आर एच व्ही इंग्लिश स्कूल, जालना वय गट अंडर -१७ वजन गट -५५kg तृतीय क्रमांक प्राप्त केला.



या सर्व विद्यार्थ्यांना सेन्साई रुपेन्द्र पारचा व सेन्साई अमन पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले

महाराष्ट्र राज्य किक बॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष अनिल मिरकर, सुमित जाधव, महावीर ढक्का, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, क्रीडा अधिकारी सिद्धार्थ कदम, क्रीडा अधिकारी आशिष जोगदंड, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वानगोता, जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल, नारायणा ई टेक्नो स्कूल ची मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार, नारायणा ई टेक्नो स्कूलचे डीन व्यंकट राजू गुडला, श्री यादव, प्रशांत प्रेमभारती, सचिन खर्डेकर, रितेश जयस्वाल, गणेश श्रीराम व पालक वर्ग यांनी कौतुक करून पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पत्रकार संरक्षण समिती मंठा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी राजेभाऊ भुतेकर तर उपाध्यक्षपदी मानसिंह बोराडे

**मंठा । प्रतिनिधी -** वतन की रक्षा आपने कलम से या प्रेरणादायी घोषवाक्यासह पत्रकार संरक्षण समिती जालनाच्या अंतर्गत दि.१७ नोव्हेंबर रोजी पत्रकार गजानन माळकर यांच्या अध्यक्षतेखाली मंठा तालुका पत्रकार संघाची बैठक घेण्यात आली.या बैठकीत मंठा तालुका प्रतिनिधी राजेभाऊ भुतेकर यांची समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

उर्वरित कार्यकारिणी अतुल खरात सचिव, गजानन माळकर कोषाध्यक्ष, सुरेश दवणे सहसचिव तर भागवत (बाबाराजे) गोंडगे, अंकुश देशमाने, आशिष मोरे व संदीप गायकवाड यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

सदर निवड पत्रकार संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे यांच्या आदेशाने जिल्हाध्यक्ष अशोक गाढे यांनी केली. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा भाऊसाहेब गोरे यांनी शाल, पुष्पहार, श्रीफळ देऊन सत्कार केला. या निवडीमुळे तालुका स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. सदर कार्यक्रमाला पत्रकार बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## जामवाडीतील युवक भाजपात

# युवकांचा भाजपमध्ये प्रवेश हा विकासावरचा विश्वास आहे - जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे



**जालना । प्रतिनिधी -** श्रीकृष्ण नगर (जामवाडी) ता.जालना येथील युवकांनी (ता.१८) रोजी शिवसेनेतून भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वात ठेऊन व भास्कर दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांनी भाजपात प्रवेश केला. अविनाश मोहिते यांच्या पुढाकाराने व समन्वयातून प्रवेश करणाऱ्यांमध्ये चिमाजी आण्णा पवार, कैलास बाबुराव पवार, तेजेश राजेंद्र धनवटे, सचिन राजेंद्र गुंजाळ, दिपक भगवान गुंजाळ, ज्ञानेश्वर माने, गणेश अशोक मोहिते, सुरज राजू पवार, ओम कैलास कूसळकर, विठ्ठल संतोष पवार, बबलू अवचितराव गुंजाळ, रोहित दिलीप धनवटे, अशोक रामकिसन मोहिते या युवकांचा समावेश. युवकांचा भाजपमध्ये प्रवेश हा विकासावरचा विश्वास आहे, या युवकांच्या सहभागामुळे पक्ष अधिक सक्षम होणार असून सर्वांगीण विकासाला गती मिळेल असे प्रतिपादन भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले व सर्वांचे पक्षामध्ये मनःपूर्वक स्वागत करून त्यांच्या राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी अविनाश मोहिते, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, विष्णुबापू डोंगरे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.




# महाराष्ट्र राज्यस्तरीय सिलंबम स्पर्धेत जालना जिल्ह्याचा विजयाचा धडाका

## संपूर्ण १३ खेळाडू राष्ट्रीय पातळीवर पात्र; ७५० खेळाडूंमध्ये जालना ठरला ठसठशीत विजेता

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय सिलंबम स्पोर्ट्स स्पर्धा व राष्ट्रीय निवड चाचणी (लाठी-काठी) चंद्रपूर येथे १६ नोव्हेंबर २०२५ रोजी थाटात पार पडली. राज्यातील तब्बल २० जिल्ह्यांमधून ७५० पेक्षा जास्त खेळाडू सहभागी झालेल्या या भव्य स्पर्धेत जालना जिल्ह्याने इतिहास घडवत सर्व १३ पैकी १३ खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरवून दमदार कामगिरी केली. या स्पर्धेत मराठवाड्याच्या वतीने जालन्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्व स्पर्धकांनी आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याने राज्यभरात जाळ फडकावली. पुढील राष्ट्रीय स्पर्धा विजापूर (कर्नाटक) येथे होणार असून त्यासाठी सर्व खेळाडूंनी पात्रता मिळवल्याने जालन्याच्या क्रीडा इतिहासात हा एक मैलाचा दगड ठरला आहे.

**विविध वयोगटांतील खेळाडूंची राज्यात चमकदार कामगिरी**

१० वर्ष वयोगटात रुद्राक्ष भूषण यादव (गोल्ड मेडल) एम एस जैन इंग्लिश स्कूल,जालना, कु.जानव्ही काकडे (गोल्ड मेडल) आरएचव्ही इंग्लिश मीडियम स्कूल जालना,

१४ वर्षा आतील वयोगटात हर्षवर्धन राजेंद्र गौरक्षक (गोल्ड मेडल) शांति निकेतन विद्या मंदिर जालना, पृथ्वीराज बेंद्रे (गोल्ड मेडल) सेंट जॉन इंटरनेशनल स्कूल जालना,

१७ वर्षा आतील वयोगटात मानस दब्बड़वार (गोल्ड मेडल) मत्स्योदरी विद्यालय इंदेवाड़ी,

१० वर्ष वयोगटात सोहम करण तांबे (ब्रॉन्ज मेडल) सिलेक्शन ट्रायल पास

१२ वर्ष वयोगटात मुलीं संतोषी गायकवाड़, स्नेहल शेजूळ, श्रध्दा कढ़वणे, श्रावणी साबळे, (ब्रॉन्ज मेडल) श्री गणपति प्राथमिक विद्या मंदिर राजुर(गणपति) कस्तूरी हिवरेकर, संस्कार प्रबोदनी स्कूल जालना,

तर खुल्या गटात प्रतिक्षा दब्बड़वार (गोल्ड मेडल, राष्ट्रीय पंच परीक्षा साठी पात्र) साक्षी दुग्गड़ (सिल्वर मेडल, राष्ट्रीय पंच परीक्षा साठी पात्र) यांनी सिलेक्शन ट्रायल पास करत राष्ट्रीय पातळी साठी आपली जागा बनविली. या सर्व खेळाडूना




जालना सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन चे अध्यक्ष मराठवाड़ा विभाग प्रमुख तसेच जालना सिलंबम स्पोर्ट्स चे तांत्रिक संचालक भूषण यादव यांच्या कडून प्रशिक्षण मिळाले तर तांत्रिक सल्लागार व असोसिएशन चे सचिव प्रा.डॉ. नितिन भक्त यांचे विशेष मार्गदर्शन लाभले,या यशा बद्दल सर्व खेळाडूचे ज़िल्हा क्रीड़ा अधिकारी संजय गाढ़वे, तालुका क्रीड़ा संयोजक शेख चांद, भोकरदन तालुका क्रीड़ा संयोजक मतकर, जंजाळ, किरण साळवे, GES एजुकेशनल ग्रुप राजुर चे ज्ञानेश्वर पाटिल पुंगले, प्राचार्या सौ आशाताई पुंगले, जैन इंग्लिश स्कूल च्या कुलकर्णी, गोयल मॅडम, अनिल जिंदल वर्ल्ड स्कूल च्या शिल्पा लोखंडे, डॉ. धनश्री सबनीस, योगिता मनवर, सौ.अश्विनी गोरे, सविताबाई गौरक्षक, बलिराम बेंद्रे, वैशाली दब्बड़वार, सार्थक हिवरेकर, सुनील जोशी, गट्टानी, किरण देशमुख, किरण झारखण्डे, करण तांबे, डॉ. अस्मिता मोरे, रोहित जायसवाल, राजा जाधव, ज्ञानेश्वर साबळे, साईनाथ गायकवाड़, मुकेश यादव, निवांत नंदाने, सतीश जाधव, कुणाल शिंदे, अजय जाधव, गजानन क्षीरसागर, भरत सतिकर, जय दुग्गड, आदित्य कढवने, रामु शेजुळ, यांनी विजेत्या खेळाडूंचे कौतुक केले तसेच पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

---

जालना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची कामगिरी

# आठ महिन्यांपूर्वी पळवून नेलेल्या आरोपीला पुणे जिल्ह्यातील पुरंदरमधून अटक



**जालना । प्रतिनिधी -** पोलीस दलाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने एका जुन्या अपहरण प्रकरणात मोठी कामगिरी बजावली आहे. सुमारे आठ महिन्यांपूर्वी परतूर येथून पळवून नेण्यात आलेल्या अल्पवयीन मुलीचा आणि आरोपीचा पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातून शोध घेऊन त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

दिनांक ३०/११/२०२४ रोजी परतूर पोलीस स्टेशन येथे एका अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी भा.न्या.सं. कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यातील आरोपी धर्मा आत्माराम कोळी (रा. रुपजी नगर, ता. अमळनेर, जि. जळगाव) हा निष्पन्न झाला होता. बराच कालावधी उलटूनही पीडित मुलगी व आरोपी यांचा शोध लागत नसल्याने, मा. पोलीस अधीक्षक सो. यांच्या आदेशानुसार या गुन्ह्याचा पुढील तपास दिनांक १८/०८/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता. अ.मा.वा.प्र. कक्षाच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदार यांच्या मदतीने आरोपी व पीडितेची माहिती काढण्यास सुरुवात केली.

मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार, आरोपी धर्मा कोळी हा पीडित मुलीसह झेंडेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे राहत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ झेंडेवाडी येथे जाऊन आरोपी धर्मा कोळी याला ताब्यात घेतले आणि पीडित मुलीला तिच्या सुरक्षिततेसाठी ताब्यात घेतले.

गुन्ह्यातील पीडित आणि आरोपी या दोघांनाही पुढील तपासकामी परतूर पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे.

या कारवाईत अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रविंद्र जोशी, पोउपनि संजय गवळी, तसेच पोहेकॉ कृष्णा देठे, पोहेकॉ सागर बावीस्कर (स्थागुशा), महिला अंमलदार संगिता चव्हाण, पुष्पा खरटमल, आरती साबळे, रेणुका राठोड आणि चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांचा समावेश होता.

---

# शिवसेनेकडून इच्छुक उमेदवारांचे अर्ज घेण्यास सुरुवात



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , शिवसेना नेते खा. श्रीकांत शिंदे , उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर व आमदार हिकमत उढाण यांच्या आदेशाने युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए. जे बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली येणाऱ्या जालना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक तसेच जालना शहर महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना पक्षाकडून उमेदवारी मिळवू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी आपल्या इच्छुक उमेदवारी अर्जांची नोंद भाग्यनगर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात करावी, असे आवाहन जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए. जे. बोराडे व शहर प्रमुख विष्णु पाचफुले, आत्मानंद भक्त यांनी केले आहे.

जिल्ह्यातील विविध जि.प.गट व पं स. गण आणि जालना शहर महापालिकांमधील प्रभाग आणि विभागांमधून निवडणुकीसाठी इच्छुकांसाठी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, ठरविलेल्या कालावधीत सर्व इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावे.

पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने पारदर्शक पद्धतीने उमेदवारी अर्जांची छाननी केली जाणार असून, स्थानिक पक्षकार्य, जनसंपर्क, विकासदृष्टिकोन आणि संघटनात्मक बांधिलकी या निकषांवर उमेदवारांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना पक्षाच्या वतीने देन्यात आलेली आहे.

शिवसेना संपर्क कार्यालयात प्रतिदिन ठरावीक वेळेत अर्ज स्वीकारले जाणार असून, इच्छुकांनी नियोजित वेळेत उपस्थित राहुन इच्छुक अर्ज भरून द्यावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी चे अर्ज जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे ऐ जे बोराडे व स्वीय सहाय्यक रमेश चांदर यांच्याशी संपर्क करावा तसेच जालना शहर महापालिकेसाठी माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर, विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त व ज्ञानेश्वर डोंगरे यांच्याशी संपर्क साधुन दि.२१ नोव्हेंबर २०२५ ते ३० नोव्हेबर २०२५ पर्यंत सकाळी १० ते सायं ५ वाजेपर्यंत

नोंदणी करावी असे आवाहन करन्यात आले आहे.

---

# आई-वडिलांची सेवा करा, तुम्हाला कोणत्याच तीर्थाला जाण्याची गरज नाही - हभप संजय महाराज पाचपोर

**जालना । प्रतिनिधी -** प्रत्येकास आई-वडील लहानपणापासून मोठे होईपर्यंत लक्ष देतात तसेच आई-वडील जेव्हा म्हातारे होतात तेव्हा त्यांच्याकडे त्याचप्रमाणे लक्ष दिल्यास जीवनाचे कल्याण होते. आई-वडिलांची सेवा करा, तुम्हाला कोणत्याच तीर्थाला जाण्याची गरज नाही असे प्रतिपादन रामायणाचार्य ह भ प संजय महाराज पाचपोर यांनी कीर्तनातून बोलतांना केले बदनापूर तालुक्यातील डोंगरगाव सायगाव येथील श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम येथे अखंड हरिनाम सप्ताहातील कीर्तनात बोलत होते पुढे बोलतांना महाराज म्हणाले की ज्याप्रमाणे आई-वडील आपला सांभाळ करतात त्याचप्रमाणे संतही समाजाचा सांभाळ करतात आईसारखे साधू संतांचे हृदय असते, मुलांच्या कल्याणासाठी आई-वडील जसे कळकळत असतात तसेच समाजाच्या कल्याणासाठी संतही कळकळत असतात, आई-वडील जन्म देतात परंतु त्यास घडविण्याचे काम गुरु करत असतात जेवढा आनंद आई वडिलांना होतो तेवढाच आनंद गुरुला ही होतो, गुरु जसे शिक्षणासाठी कृती करतात तसेच संत समाजासाठी कृती करतात, प्रत्यक्ष देवाची पूजा करावयाची असेल तर साधूची पूजा करा ती देवापर्यंत पोहोचते, देवाला नैवेद्य द्यावयाचा असेल तर गाईला नैवेद्य द्या तो देवाला पोहोचतो तुकाराम महाराजांची सेवा करा तुम्हाला देव प्रसन्न होतो, देवाला प्रसन्न करण्यासाठी साधूची सेवा करा. जो मंदिराचे खातो त्याला जीवनात काहीच पुरत नाही व जो गाईची सेवा करतो त्याला जीवनात कधीच कमी पडणार नाही. असे महाराजांनी कीर्तनातून बोलतांना सांगितले , या वेळी यांची धर्मपिठावर उपस्थिती होती तर पखवाज साथ संगत सर्वश्री हभप बळीराम महाराज गवारे, सुमित महाराज शिनगारे, गायन साथ संगत, महंत गोचरण किंकर हभप प्रभाकर महाराज शास्त्री, उद्धव महाराज घनघाव बद्रीनाथ महाराज शेळके, अरुण महाराज शिरसाट, अशोक महाराज उकिरडे, डॉक्टर प्रदीप हुशे सर्वश्री हभप नागेश महाराज नानकिल्ले, तुळशीराम महाराज दाभाडे, दादासाहेब महाराज पाटील, दत्ता महाराज शेळके निवृत्ती महाराज देवडे, यांनी केली.




---

# राजेवाडी शाळेतर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जनजागृती फेरी

**जालना । प्रतिनिधी -** जागर बदलाचा, समृद्ध महाराष्ट्राचा या संकल्पनेवर आधारित मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत बदनापूर तालुक्यातील राजेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतर्फे भव्य जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. गावातील नागरिकांना या अभियानाचे महत्व पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध घोषणाबाजी करत, फलक हातात घेऊन गावभर परिक्रमा केली. फेरीदरम्यान स्वच्छता, साक्षरता, आरोग्य, ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, तसेच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांबाबत माहिती देत ग्रामस्थांना जागरूक करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्त आणि संदेश देण्याची पद्धत पाहून गावकरीही कौतुकाने त्यांना पाठिंबा देत होते. या उपक्रमामध्ये मुख्याध्यापक जगत घुगे यांनी अभियानाचे उद्दिष्ट सांगत ग्रामविकासात नागरिकांच्या सक्रीय सहभागाची गरज प्रतिपादन केली.

---

# महापालिकेचा कारभारावर प्रश्नचिन्ह; शहरात घाणीचे साम्राज्य कायम

## गांधीनगर भागातील नागरीकांनी केली अतिरिक्त आयुक्तांकडे तक्रार

**जालना । प्रतिनिधी -** भ्रष्टाचारी आयुक्त संतोष खांडेकर यांचा जेलमध्ये प्रवास लांबला आहे. त्यांच्या न्यायालयीन कोठडीनंतर शासनाने महापालिकेचा कारभार जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडे दिला आहे. जिल्हाधिकारी असलेल्या मित्तल यांच्या कडे कारभार आल्यानंतर महानगर पालिकेच्या कारभारात सुधारणा होण्याची शक्यता निर्माण झाली होती. तसे जालनेकरांना अपेक्षितही होते. पण तरीही कोणतीही सुधारणा शहराच्या सौंदर्यात होताना दिसून येत नाही. याबाबत गांधीनगर भागातील नागरीकांनी एक निवेदन अतिरिक्त आयुक्तांना दिले आहे. घंटा गाडी कचरा उचलण्यास येत नाही, खांबावरील लाईट बंद आहेत, घाण जास्त पसरलेली आहे तसेच नाल्यातील घाण सुध्दा काढलेली नाही सर्व कामे तात्काळ करा अशी मागणी नागरीकांनी केली आहे.यावरून जिल्हाधिकारी मित्तल यांची महापालिकेच्या कारभारावर किती पकड आहे हेच दिसून येत आहे.

समाज सेवक शहेबाज रहिम अन्सारी यांनी ही तक्रार केल्यानं जालना ही महापालिका नसून ग्रामपंचायत असल्याची टिका होऊ लागली आहे. गांधीनगर भागात खांबावरील लाईट नविन लावण्यात यावेत तसेच बंद पडलेले लाईट काढून घ्यावे हायमॅक्स लाईट चालु करावे अशी मागणी करत या भागतील नागरीकांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे कान टोचले आहे. निवेदनावर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. महापालिकेला दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की सदर वार्डात घाणच घाण व खांबावरी लाईट बंद पडलेले आहेत. लाईट व्यवस्था फारच डबघाईस आलेली आहे. सर्वत्र वार्डात नाल्या साचलेल्या आहेत, त्या त्वरेने काढुन घाण उचलण्यात यावी, अंडरग्राऊण्ड नाली करुन पाईप टाकणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच खांबावरील लाईट नविन लावण्यात यावेत तसेच बंद पडलेले लाईट काढुन घ्यावे, हायमॅक्स लाईट चालु करावे. सदर वार्ड स्वच्छ करण्यात यावा. तरी परिसरात स्वच्छता करावी व लाईटची व्यवस्था करण्यात यावी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ता शहेबाज़ अन्सारी, जगदीश सातपुते, सहेफ अन्सारी, शेख बाबा यांची उपस्थिती होती.



---

# संरक्षण नको

## मनोज जरांगे पाटलांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी जालन्याचं पोलीस अधीक्षकांना यांना अर्ज़ दिले मला पोलिस संरक्षण नको, मला देण्यात आलेलं पोलीस संरक्षण तातडीने काढून घ्या असा अर्ज आज मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी जालन्याच्या पोलीस अधीक्षकांना दिला आहे. जरांगे यांनी त्यांचे सहकारी किशोर मरकड यांच्या मार्फत हा अर्ज पोलीस अधीक्षकांना दिला आहे. घातपाताचा कट रचणारा धनंजय मुंडेच असून कटाच्या मुख्य सूत्रधाराला सरकार चौकशीपासून आणि अटकेपासून वाचवत असल्याचा आरोप जरांगे यांनी या अर्जाच्या माध्यमातून केला आहे.मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री धनंजय मुंडे यांना पूर्ण ताकतीने वाचवण्याचा प्रयत्न करत असून मला देण्यात आलेलं पोलीस संरक्षण तात्काळ काढून घ्या अशीही मागणी जरांगे यांनी या अर्जाच्या माध्यमातून केली आहे.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.